Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred Journal*

**June 2021 Volume-11 Issue-16**

## *Sustainable Development Goals: Initiatives, Execution and Challenges*

**Chief Editor**
**Dr. R. V. Bhole**
**'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)**

**Guest Editor**
**Dr. Prof. H. B. Rathod**
**Principal**
**Gramin (ACS) Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal), Tal. Mukhed**

**Executive Editors**
**Dr. V. T. Naik**
**Mr. B. C. Rathod**


Co- Editors
Dr. D. K. Kendre
Mr. S. A. Jewale
Dr. U. D. Padamwar














**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

## CONTENTS



| Sr. No. | Paper Title |
|---|---|
| 1 | भारत में लिंग असमानता<br>प्रो.डॉ.कल्याण गुरुनाथ |
| 2 | वर्तमान समाज विकास मे संत साहित्य की भूमिका<br>प्रा.रामकृष्ण बदने |
| 3 | सर्वसमावेशक वृध्दीसाठी दारिद्रय निर्मूलनाची गरज<br>कैलास सत्यवान शेलार |
| 4 | महाराष्ट्रातून भारतातील इतर प्रमुख भागात जाणारे लोहामार्गांचा एक भौगोलिक अभ्यास<br>Dr.Achole.P.B, Swami.B.M |
| 5 | शाश्वत विकासात रा.से.यो.चे योगदान<br>निलेश दे. हलामी |
| 6 | नांदेड जिल्हयातील लघू प्रकलपामूळे सिंचन क्षमतेतील झालेला बदल (*सन १९९१--९२ व २०१०--११ हे वर्ष तुलनात्मक पद्वतीने अभ्यास*)<br>डॉ.डी.एस.चव्हाण |
| 7 | शाश्वत विकास काळाची गरज<br>*प्रा. डॉ. जे. के. वाघमारे प्रा. डॉ. आर. एन. कस्पटे* |
| 8 | भारतातील गरीबी निर्मूलनासाठी शाश्वत समजाकल्याणकारी विचार<br>*प्रा.मठपती जी.एच.* |
| 9 | बढ़ता नगरीकरण और इसके प्रभाव<br>*गिरीश टी. पंचभाई* |
| 10 | प्राथमिक शिक्षा मे बच्चों के मूलभूत सेवाओं का अध्ययन<br>*सीमा यादव डॉ.मृत्युन्जय मिश्रा* |
| 11 | स्त्री - पुरुष तुलना व स्त्रियांची शैक्षणिक स्थिती<br>*डॉ.गजानन बापुराव ठाकरे* |
| 12 | शाश्वत विकास - एक अभ्यास<br>*प्रा. सौ. रुपाली गोवर्धन दिकोंडा* |
| 13 | हिन्दी – मराठी दलित आत्मकथाओं में सामाजिक जीवन<br>डॉ. व्ही. पी. चव्हाण. |
| 14 | गडचिरोली जिल्हयातील कामगारांचे प्रमाण: निरंतर विकास<br>*प्रा. डॉ. गणेश एल. धोटे, डॉ. जे. व्ही. दडवे, प्रा. डॉ. के. वाय. ठाकरे* |
| 15 | स्त्रियांची सामाजिक व राजकीय स्थिती<br>प्रा.डॉ.प्रदीप शा. ढोले |
| 16 | *परळी तालुक्यातील पोषण घनता : एक भौगोलिक अभ्यास*<br>*श्री. कैलास भास्कर लव्हाळे , डॉ.व्ही.एस.चिमनगुंडे* |
| 17 | भारूड भक्तीनाट्याचे स्वरूप व तत्वज्ञान.<br>*प्रा.डॉ.शिवाजी सटवाजी वाघमारे* |
| 18 | ठाणे – पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येच्या लिंग गुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास<br>*प्रा. मानकरे ज्ञानेश्वर रघुनाथ डॉ.के.बी कणकुरे* |
| 19 | नांदेड जिल्ह्यातील करडाई पीकाचा भौगोलिक अभ्यास<br>*प्रा.डॉ.यु.एस.कानवटे* |
| 20 | गरीबी निर्मुलन वेध व अभ्यास<br>*प्रा.सौ. अरुणा ईटकापल्ले, प्रा. सारीका बकवाड* |
| 21 | कोरोना व्हायरसचा पर्यटनावरील प्रभाव<br>प्रा. डॉ. कळसकर सूर्यकांत नागनाथ |
| 22 | शाश्वत विकास ध्येये निर्देशांक आणि भारत<br>*प्रा. डी. बी. कोनाळे* |

| | | |
|---|---|---|
| 45 | मोहोळ तालुका पर्जन्य विचलता- एक भौगोलिक अभ्यास | श्री. हनुमंत शंकर हेळकर, प्रा. डॉ. डी. जी. शिंदे |
| 46 | भारत मे सतत विकास लक्ष्य-चुनोतीया एवं सम्भावनाये | प्रो.विकास वर्मा |
| 47 | अहमदपूर तालुक्यातील पाझर तलाव जलसिंचन स्रोताचा भौगोलिक अभ्यास | प्रा डॉ.राठोड वी.एस. |
| 48 | कंधार तालुक्यातील ग्रामीण वस्तीतील सेवा केंद्राचा चिकित्सक अभ्यास | केंद्रे गणपत गंगाधर, प्रा. डॉ. मानकरी एम. पी. |
| 49 | भारतीय शेती व्यवसायात प्रधानमंत्री पिक विमा योजनेचे योगदान | प्रा.डॉ.एम.डी.कच्छवे |
| 50 | जागतिक लोकशाही निर्देशांक आणि भारत | प्रा.डॉ.आंधळे बी.श्री. |
| 51 | सशस्त्र बलों में लैंगिक समानता : एक अध्ययन | श्री. मंगेश भगवंतराव कुलकर्णी,प्रा. डॉ. सौ संपदा सुधाकरराव कुलकर्णी |
| 52 | शाश्वत विकासाची ध्येये: संकल्पना आणि स्वरूप | श्रद्धा मोहन पवार |
| 53 | शाश्वत शेती संकल्पना: आव्हाने आणि संभावना | प्रा. सुकुमार दत्ता पाटील प्रा. डॉ. एल. एच. पाटील |
| 54 | उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा व तुळजापूर तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांमधील अंतरण एक अभ्यास | प्रा. सतिश डी. गावित प्रा. डॉ. मदन व्ही. सूर्यवंशी |
| 55 | कोरोना परिप्रेक्षात भारतीय समाज व अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम | प्रा. डॉ. झाकीरहुसेन हाकीम मंदे |
| 56 | भारतीय लोकसंख्या आणि शाश्वत विकास | प्रा. शत्रुघ्न नामदेव लोहकरे |
| 57 | लातूर जिल्ह्यातील यात्रा केंद्राच्या अभिक्षेत्रीय वितरणावर परिणाम करणाऱ्या घटकांचा भौगोलिक अभ्यास | डॉ. केरबा कांबळे |

# शाश्वत शेती संकल्पना: आव्हाने आणि संभावना

प्रा. सुकुमार दत्ता पाटील[1] प्रा. डॉ. एल. एच. पाटील[2]

[1]डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य व सौ., के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालय, रोहा - रायगड[1]

[2]उपप्राचार्य आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक शिवाजी महाविद्यालय उदगीर, लातूर

**गोषवारा :-** सर्वसाधारणपणे दुसऱ्या महायुद्धापासून शेती व्यवसायामध्ये नाट्यमय बदल झाले आहेत. नवीन तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण, नवीन रासायनिक खतांचा वापर आणि जास्तीत - जास्त उत्पादनास अनुकूल असणाऱ्या सरकारी धोरणांमुळे अन्नधान्याची उत्पादकता वाढली आहे. सध्या शाश्वत शेती हा जगातील बऱ्याच भागांमध्ये मोठ्या आवडीचा आणि वादविवादाचा विषय आहे. बहुतेक कृषितज्ञ हे मान्य करतात कि, शाश्वत अथवा चिरंतन शेती ही संकल्पना आपल्या जीवसृष्टीच्या शाश्वततेसाठी सर्वात महत्वपूर्ण आहे आणि वाढत्या लोकसंख्येचा वाढत्या अन्नधान्याच्या गरजा भागविण्यासाठी उपयुक्त आहे.

**संशोधनातील कूट शब्द : चिरंतन शेती**

प्रस्तावना : तसे पाहिले तर सध्या शाश्वत शेती हा विषय जगातील बऱ्याच विभागांमध्ये अत्यंत आवडीने अभ्यासला जाणारा एक जिवंत वादविवादाचा विषय आहे. शाश्वत शेती म्हणजे काय यासंबंधीचे वादविवाद आज वेगवेगळया दृष्टिकोनातून उभे राहिले आहेत. शाश्वत शेती ही अशी व्यवस्था आहे की, " शाश्वत शेती म्हणजे अशी शेती कि, जी दीर्घकाळपर्यंत पर्यावरणाची गुणवत्ता वाढविते. तसेच ज्यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याच्या गरज पूर्णपणे भागविल्या जातात. तसेच जी शेती आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य असून ज्यामुळे संपूर्ण समाज आणि शेतकरी यांच्या जीवनाची गुणवत्ता वाढविते." शाश्वत शेतीच्या वरील व्याख्येवरून असंख्य परिभाषा निर्माण झाल्या, परंतु शेती शाश्वततेची संकल्पना समान आहे. शाश्वत शेती ही अखिल मानवजातीची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी तसेच मानवी जीवन व शेतकरी यांचे जीवनमान उंचावण्यासाठी मदत करते. परिणामी शाश्वत शेतीची सार्वभौमिक स्वीकार्य परिभाषा अद्याप उदयास आली नाही. याचे कारण असे कि, शाश्वत शेतीकडे कार्यशील पद्धतीऐवजी व्यवस्थापन तत्वज्ञान म्हणून बऱ्याच वेळा पाहिले जाते.

शेती ही हवामानाची विविधता आणि त्याचे होणारे संभाव्य परिणाम याशी अतिशय संवेदनशील आहे. अन्नसुरक्षा आणि शाश्वत पर्यावरणीय समतोल यांची देखभाल करणे ही प्रमुख आव्हाने विचारवंत, संशोधक , संरक्षणवादी आणि धोरण निर्मात्यांसमोर आहेत. शाश्वत शेती ही एक परिस्थितिकी व्यवस्था म्हणून लक्षात घेता येईल, जेथे माती- पाणी- वनस्पती- पर्यावरण- सजीव सृष्टी या सर्व बाबी या अन्नसाखळीच्या व संबंधित ऊर्जा संतुलन स्वरूपात योग्य समतोल साधून सद्भावनेने एकत्र राहतात. जमीन आणि इतर स्रोतांच्या कार्यक्षमतेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वाढ आणि व्यक्तींना चांगला आर्थिक परतावा प्रदान करण्यासाठी आणि वैयक्तिक व आर्थिक विकास प्रक्रियेत जीवनाची गुणवत्ता सुधारणे आणि आर्थिक विकास साधणे हा नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाच्या पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्याचा हेतू आहे. आधुनिक सिंचन प्रणाली, सुधारित वाण, सुधारित मातीची गुणवत्ता आणि संसाधन संवर्धन तंत्रज्ञान वापरून कायमस्वरूपी पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी, शेती आणि उत्पादकता सुनिश्चित करण्यासाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. या बदलांमुळे अनेक सकारात्मक प्रभाव पडले आहेत. आणि शेतीमध्ये बऱ्याच प्रमाणात धोके कमी झाले आहेत .पण असे असले तरी कांही खर्चदेखील लक्षणीय आहेत. या खर्चात प्रामुख्याने भूपृष्ठावरील मातीचे प्रमाण कमी होणे, भूगर्भातील पाणी दूषित होणे, कुटुंबाच्या वाट्याला येणाऱ्या शेतीचे प्रमाण कमी होणे, शेतकरी व शेतमजूर यांच्या कामाच्या आणि राहण्याच्या स्थितीकडे सतत दुर्लक्ष होणे, वाढता उत्पादन खर्च, आणि समुदयामध्ये आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती यांचे सातत्याने विघटन इ. चा समावेश होतो. आधुनिक शेती पद्धतीमुळे होणाऱ्या नकारात्मक पर्यावरणीय परिणामांना टाळण्यासाठी शाश्वत शेतीची संकल्पना उदयास आली. शाश्वत शेतीची संकल्पना अजूनही